# वेणा सृजनाच्या....

स्मिता भागवत.

नेमक्यावेळी विशिष्ट विचार विशिष्ट भाषेत का व्यक्त होतो, हा माझ्या मनातील सनातन प्रश्न आहे. वस्तुतः मराठी, गुजराती, हिंदी आणि इंग्रजी या चारही भाषात सारख्याच सहजतेने व्यक्त होण्याची मला सवय! तरी एखादा विचार अमुक भाषेत का व्यक्त होतो ते मला कळत नाही. कुणीसे म्हटले आहे, creation is perversion मला ते पटत नाही आणि सृजन हे काय गौड बंगाल आहे, ते उमजतही नाही. हे सारे कुठून येते ते मी सांगू शकत नसले तरी हे कसे घडते ते - सृजनाची प्रक्रिया मी काही वेळा शब्दात मांडू शकते. मला वाटते....

मनात सतत अरूप भावभावनांची घुसळण होत असते. बाहेर येण्यासाठी त्यांची सतत धडपड चालू असते. रूप आणि अरूप यांची भेट घडते तेव्हा सृजनाची वाट मोकळी होते. कुठलासा प्रसंग वा घटना वा मनाची तडफड यास कारणीभूत ठरते. मग अचानक जणू शब्द अलगद खांद्यावर येऊन बसतात. लोभस पाखरासारखे! शब्दांच्या 'पंखांची' फडफड एक साखळी रचू लागते आणि हातात हात घालून ते कागदावर उतरतात. कवितेच्या रुपात तर कधी मुक्तक बनून वा कधी कथेच्या रूपात! कधी कधी माझेच शब्द मला चकित करतात... हे मी लिहिले? हे सारे शब्द माझ्या शब्दभांडारात बालपणापासून होते. मग आजवर त्यांनी 'अशी' साखळी का रचली नाही, या यक्षप्रश्नाचे उत्तर माझ्यापाशी नाही.

आता हेच बघाना, दिवाळीस मी नातवाला रामायण आणि महाभारताच्या दृकश्राव्य फितींची मालिका भेट दिली. दूरदर्शनवर या मालिका येत होत्या तेव्हा तो माझ्या प्रपंच्यातील अतिव्यस्ततेचा काळ होता. मालिका बघत बसायला मला वेळ नसे. प्रत्येक भारतीय व्यक्तीप्रमाणे रामायण महाभारताच्या कथावस्तूशी मी परिचित होते हे स्वाभाविकच! तरी प्रत्येकाच्या सादरीकरणात फरक असतो. म्हणून प्रापंचिक जबाबदाऱ्या संपल्या असल्याने मी नातवाबरोबर मालिका बघू लागले. 'त्या' दिवशी शबरीचा कथाभाग होता. मला परिचित असलेला! कित्येकदा पदार्थ चाखून 'माझी शबरीची बोरे' अशी मखलाशी करत मी माझ्या सुगरण नसण्याच्या वास्तवावर पांघरूण घातले आहे. तरी....

'त्या' दिवशी घडले ते तोवर घडले नव्हते. शबरीचे कथानक असलेला भाग पाहून मी दूरदर्शन समोरून उठले नि सरळ संगणकापाशी बसले. खांद्यावर फडफडणारी शब्दपाखरांची साखळी अचानक उतरली - मुक्तक रुपात!

**समुद्र शबरी धरणी राम!**

म्हणतात वसुधेवर आहे तीन भाग पाणी आणि एक भाग जमिनीचा!
तसा आहे अजून एक अनुपात.

मानवदेहात तीन भाग पाणी आणि एक भाग अस्थी आणि स्नायुंचा!
हृदय धडकते जशी असते समुद्राची गाज,

असेल का ती सागराची भाषा की असेल धरेच्या हृदयाची  धडधड?
हे खरं आहे की समुद्राचं पाणी खारट असतं, मग त्यानं धरणीला दिलेलं दान का गोड असतं?
खरंच पावसाचं पाणी का खारट नसतं?

सागरजलानं बनलेल्या ढगात का खारं पाणी नसतं?
मानत असेल का समुद्र धरणीला राम?

आणि असेल का शबरी सागराच्या मनात दडलेली?
चाखून गोड बोरं रामास देणारी शबरी  आणि

खारेपण स्वतःपाशी  ठेऊन धरेवर वर्षाव करायला मेघ घडवणारा सागर
असतील का ते एका जातीचे?

आज  वाटतंय,  खरंच समुद्र शबरी आणि  धरणी राम,
युगायुगांपासून ही कहाणी चालू आहे अविराम! ही कहाणी अ-विराम!!

Smita Bhagwat.

Canada

1 289 752 8885

smitacap@gmail.com